माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.२११३६१/२१/अ.क्र.५८३९/२४/०१

**श्री. विजय शंकर यादव**
ए-७/५०३, वैभव सी.एच.एस.लि. आनंद नगर,
सी.एस.रोड, दहिसर (पू.), मुंबई-४०० ०६८.
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी (वसाहत) के/पूर्व,**
सहाय्यक आयुक्त के/पूर्व यांचे कार्यालय, के/पूर्व विभाग कार्यालय इमारत,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त के/पूर्व**
सहाय्यक आयुक्त के/पूर्व यांचे कार्यालय, के/पूर्व विभाग कार्यालय इमारत,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू.), मुंबई-४०० ०६९.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६.१२.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित. ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि.०९.१२.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०१.२०२१ | ०९.०२.२०२१ | २२.०२.२०२१ | - |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि. ०९.०२.२०२१ रोजीचे उत्तर संलग्न करुन दि.२४.०३.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. २२.०१.२०२१ अन्वये "Furnish the order copy or your decision in respect of order passed by the Dy collector for including my name (Shri. Vijay Shankar Yadav) in the Annexture- 2 (Sr. No.in Annexture-2 is 347)" माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारींनी दि. ०९.०२.२०२१ रोजी "अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचे निरिक्षण करुन योग्य ते शुल्क आकारुन माहिती प्राप्त करावी", असे उत्तर दिले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे प्रथम अपिल अर्ज दाखल केला आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. २४.०३.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी (वसाहत) के/पूर्व विभाग, श्री. सचिन थोरात यांचे प्रतिनिधी वसाहत अधिकारी, के/पूर्व विभाग, श्री. नागेश सावंत व श्री. आत्माराम राणे उपस्थित आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी (वसाहत) के/पूर्व विभाग, श्री. सचिन थोरात यांचे प्रतिनिधी वसाहत अधिकारी, के/पूर्व विभाग, श्री. नागेश सावंत यांनी आयोगास असे सादर केले की, सक्षम अधिकारी यांनी दि. २२.११.२०२१ रोजी अंतिम आदेश पारित करण्यात आले असून त्याची प्रत अपीलार्थी यांच्या प्रतिनिधी यांना दि. ०३.१२.२०२१ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी (वसाहत) के/पूर्व विभाग यांनी अपीलार्थी यांना माहिती दिली आहे.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक :२६.१२.२०२४**

State Information Commission Maharashtra

26-12-2024

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**